Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## Human Rights : Reality & Challanges

SPECIAL ISSUE

December-2020




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr. Sandip B. Kale
Coordinator
HOD. Dept. Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

Executive Editor:
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**December-2020**

**SPECIAL ISSUE-No-CCLIX (259)**

## Human Rights : Reality & Challanges




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr. Sandip B. Kale
Coordinator
HOD. Dept.Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

Executive Editor :
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | पर्यावरण संरक्षण और मानवाधिकार (औद्योगिक क्रांति के विशेष संदर्भ मे) | डॉ. अनुप कुमार सिंह | 1 |
| 2 | मानव अधिकार : बाल अधिकारों के संरक्षण में | डॉ. शुभ्रा मिश्रा | 4 |
| 3 | आतंकवाद नक्सलवाद और मानव अधिकार | डॉ. महेन्द्र कुमार सिरोही | 8 |
| 4 | भारतीय संविधान एवं मानव अधिकार | डॉ. कृष्णा सोलंकी | 12 |
| 5 | वृध्दावस्था: समस्यायें एवं अधिकार | डॉ. ईश्वरी घनश्यामदास खटवानी | 15 |
| 6 | मानव अधिकार संकल्पना - उल्लंघन घटनाँए | डॉ. ओमप्रकाश जे. चांडक | 20 |
| 7 | मानवाधिकार और भारतीय लोकतंत्र | डॉ. संजय एस. धोटे | 24 |
| 8 | अनुसूचित जाति में ऐमहिला उत्पीडन एवं मानवाधिकार गोंदिया जिले की महिलाओं के संदर्भ में एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ शारदा इंद्रजीत महाजन | 29 |
| 9 | भारतीय संविधान और मानवाधिकार | डॉ. अमर बोंदरे | 36 |
| 10 | समकालीन मराठी कादंबरीतून अभिव्यक्त झालेली मानवी हक्कांची जाणीव | प्रा. नरेंद्रकुमार शिवाजीराव कदम | 39 |
| 11 | डॉ बाबासाहेब आंबेडकर मानवी अधिकाराचे उद्‌गाते | डॉ सूर्यकांत महादेवराव कापशीकर | 43 |
| 12 | मानवी हक्क आणि कारखान्यातील कामगारांचे आरोग्य व सुरक्षितता | प्रा.डॉ.एम.डी.कच्छवे | 48 |
| 13 | बालकामगार आणि मानवी हक्क | प्रा.दत्तात्रय मुकूंदराव ढवारे | 55 |
| 14 | युनो, मानवी अधिकार आणि परिषदा | प्रा.डॉ.सौ.सुनिता अविनाश शिंदे | 60 |
| 15 | पर्यावरण आणि मानवी हक्क | डॉ. वकील टी. शेख | 63 |
| 16 | बालकामगारासाठी मानवाधिकार: काळाची गरज | श्री. उमेश शंकरराव कु.हाडे | 68 |
| 17 | भारतीय संविधान आणि मानवी हक्क | प्रा.डॉ. दत्ता माधवराव कुंचेलवाड | 71 |
| 18 | मानव अधिकार स्थिती व आव्हाने | प्रा. विजय मुरलिधर गावंडे | 74 |
| 19 | दलित, अल्पसंख्यांक यांच्या संदर्भात मानवी अधिकार | प्रा संतोष मारोतराव रामटेके | 78 |
| 20 | मानवअधिकार आणि महिलांची स्थिती | प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे | 82 |
| 21 | मानवाधिकार व भारतीय संविधान एक चिकीत्सक अध्ययन | डॉ.प्रशात वामनराव खेडकर | 86 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 259
ISSN : 2278-9308
December,2020

# मानवी हक्क आणि कारखान्यातील कामगारांचे आरोग्य व सुरक्षितता

प्रा.डॉ.एम.डी.कच्छवे.
वाणिज्य विभाग प्रमुख,सहयोगी प्राध्यापक,संशोधन मार्गदर्शक
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी.४३१५१६

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

- **प्रस्तावना—**

प्रथ्वीतलावरील प्रत्येक मनुष्याला कांही निसर्गसिध्द हक्क असतात. त देशातील नागरीकांना प्राप्त झाले पाहिजेत या हेतूने 'मानवी हक्क' ही संकल्पना आधुनिक काळात प्रचलीत झाली. जीवीत, उपजीविका यांच्याबरोबरच भाषण, संघटना आणि धर्मश्रध्दा यांचे स्वातंत्र्य मानवी हक्कामध्ये समाविष्ट आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेतही मानवी हक्कांचा स्पष्ट उल्लेख आढळतो. 'मानवी हक्क' किंवा 'मानवी अधिकार' हे मानवाचे मुलभूत हक्क आहेत. मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात. हे हक्क कायदेशीर किंवा उपजात असतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क उच्चयुक्त कार्यालय व मानवी हक्क समिती हया दोन संस्था जागतिक स्तरावर मानवी हक्कांचा अमलबजावणीसाठी प्रयत्न करतात. भारताच्या संविधानात व्यक्तीचे मूलभूत हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात आली आहे. भारताचे आंतरराष्ट्रीय धोरणही मानवी हक्काच्या तत्वज्ञानाशी सुसंगत असेच आहे. भारतीय संविधनाने समाजातील दुबळे घटक, स्त्रिया व अल्पसंख्याक यांच्याबाबत विशेष जबाबदारी शासनावर टाकली आहे. मानवी हक्काची कार्यवाही करण्यासाठी द्रारिद्रय, अज्ञान, विषमता यांचे उच्चाटन झाले पाहिजे. अविकसीत देशांच्या विकासासाठी कुटुंब नियोजन, शिक्षण, जमिन सुधारणा, वैद्यकीय मदत या सारख्या कार्यक्रमाला अगृक्रम देण्यात यावा. अशा कार्यक्रमांना जागतिक आरोग्य संघटना (WHO) व जागतिक बॅंक (World Bank) या संस्थाकडून मोठया प्रमाणात उत्तेजन मिळाले आहे.

- **संशोधनाचे उद्देशः—**

संशोधनाचे उद्‌देश खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

१. मानवी हक्क व कामगाराकंची संकल्पना स्पष्ट करणे.
२. मनवी हक्क संरक्षण कायदा १९९३ चा अभ्यास करणे.
३. कामगारांच्या आरोग्यासंबंधी तरतूदीचा अभ्यास करणे.
४. कामगांराच्या सुरक्षीततेसंबंधी नियम अभ्यासणे.
५. निष्कर्ष काढणे.

- **संशोधनायी गृहीतके—**

सदर संशोधनाची वरील उदेशानुसार खालीलप्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. नागरिकांची अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्याय्य व हक्काचे संरक्षण करण्यासाठी मानवी संरक्षण कायदा अस्तित्वात आला.
२. कामगांराच्या आरोग्यासंबंधी व सुरक्षितेमुळे कारखाना कायद्यात तरतूही स्पष्ट केल्या आहेत. त्यानुसार सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 259
ISSN : 2278-9308
December,2020

- **अभ्यास पध्दती–**

सदर शोध निबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात संदर्भ गृंथ, दैनिक वर्तमानपत्रातील अगृलेख, मासीके, इंटरनेट इत्यादीचा आधार घेउन निश्चित उदेशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

- **मानवी हक्क :–**

'मानवी हक्क म्हणजे व्यक्तीचे जीवनस्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा या संबंधीचे संविधानाने हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय करारामध्ये समाविष्ट असलेले आणि भारतातील न्यायालयांना अमलबजावणी करता येईल असे हक्क होय'.

**भारतीय संविधानाने प्रधान केलेले सात मुलभूत अधिकार खालीलप्रमाणे आहेत.**

१. समानतेचा हक्क

२. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क

३. शोषणापासून संरक्षणाचा हक्क

४. धार्मिक निवड व स्वातंत्र्याचा हक्क

५. सांस्कृतीक व शैक्षणिक हक्क

६. संवैधानिक प्रतिकाराच हक्क


७. मालमत्तेचा हक्क.

मुलभूत हक्क ही भारतीय संविधानातील मुलभूत अधिकाराची सनद आहे. ही सनद भारतीयांना भारतीय नागरिक म्हणून त्यांचे आयूष्य शांतता व समानतेने व्यतीत करण्योच नागरी अधिकार प्रदान करते. हे हक्क संपूर्ण जगात वंश, जन्माचे ठिकाण धर्म, जात संप्रदाय, रंग लिंग यात भेद भावाशिवाय सव्र नागरिकांना लागू आहेत.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

ISSN : 2278-9308
December,2020

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य ;
दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

भारतीय संविधानाचे शिल्पकार
डॉ. बी. आर. आंबेडकर

- **मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३**

या कायद्यात एकूण ४३ कलम आहेत. हा कायदा दि.२८ सप्टेंबर १९९३ रोजी अमालात आला. हा कायदा नागरिकांची अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्याय व हक्काचे संरक्षण करण्यासाठी मानवी संरक्षण कायदा अस्तीत्वात आला. या कायद्याच्या अमलबजावणीसाठी मानवी हक्क आयोगाची स्थापना करव्यात आली आहे. मानवी हक्क म्हणजे व्यक्तींचे जीवन, स्वातंत्र्य व सामाजिक सन्मान, मानवाला मानव म्हणून जगण्याचा हक्क आहे. प्रत्येक व्यक्तीला आपला समाजाप्रती कांही कर्तव्य असतात. व्यक्तीचा व्यक्तीमत्वाचा मुक्त व परिपूर्ण विकास हा केवळ समाजात होवू शकतो. प्रत्येकाला स्वत:चे आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्य व कल्याण साधण्यासाठी आवश्यक जीवनमान राखण्याचा अधिकार आहे. अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा, बेकारी, अपगत्व, आजारपण इत्यादी आवश्यक सामाजिक सेवांचा समावेश होतो. कलम २६मध्ये प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे. किमान प्राथमिक आणि मूलभूत स्थरावरील शिक्षण मोफत असेल. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. मानवी व्यक्ती महत्वाचा सर्वागिण विकास साधणे आणि मानवी हक्क व स्वातंत्र्याविषयी आदर बळकट करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. सर्वजण कायद्यापुढे समान असतील आणि कोणताही भेदभाव न करता कायद्याच्या समान संरक्षणाचा सर्वांना अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला मनमानी अटक किंवा बेकायदेशीररीत्या हद्यपार करता येत नाही. प्रत्येक व्यक्तीला आपले हक्क व जबाबदाऱ्या निर्धारित करणे आणि स्वत:वरील गुन्हेगारी स्वरूपाच्या आरोपाबाबत स्वतंत्र व नि:पक्षपाती लवादामार्फत दोषी ठरविल्या

जात नाही तोपर्यंत तिला निर्दोष मानले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या देशाअंतर्गत कोणतेही भागात संचार करण्याचा अधिकार आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या देशाशिवाय कोणतेही देश सोडून जाण्याचा आणि त्यादेशात परत येण्याचा हक्क आहे. कलम १७ नुसार प्रत्येकाला वैयक्तीक व सामूहिक रित्या मालमत्ता बाळगण्याचा अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता बेकायदेशीररीत्या हिरावून घेता येणार नाही. प्रत्येकाला मत स्वातंत्र्य व अविष्काराचे स्वातंत्र्य आहे. तसेच प्रत्येकाला शांततामय मार्गाने सभा भरवण्याचा आणि संघटना बांधण्याचा अधिकार आहे. समाजाचा सदस्य म्हणून प्रत्येकाला सामाजिक सुरक्षेचा हक्क आहे. आणि आपली व्यक्तीगत प्रतिष्ठा तसेच व्यक्तीमत्वाचा मुक्त विकासासाठी राष्ट्रीय प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रत्येक देशाचे संघटन व संसाधनांच्या प्रमाणात आपले आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीत हक्क प्राप्त करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक व्यक्तीला कामाचा, आपल्या इच्छेनुसार रोजगार निवडीचा, कामाच्या ठिकाणी न्याय व अनुकूल परिस्थिती असण्याचा आणि बेकारीपासून संरक्षणाचा हक्क आहे. काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कामासांठी समान वेतन मिळण्याचा अधिकार आहे. काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आणि त्याच्या कुटुंबाला सन्मानाने जगता यावे यासाठी न्याय व योग्य वेतन मिळवण्याचा हक्क आहे. कलम २४ नुसार प्रत्येकाला विनंती आणि विरंगुळयाचा अधिकार आहे. यात कामाचे निश्चित व मर्यादित तास आणि नियमित पगारी सुट्टीचा समावेश होतो.

- **कामगारांच्या आरोग्यासंबंधी तरतूदी**

कारखाने आणि उत्पादन संस्थात काम करणाऱ्या कामगारांच्या हितासाठी आलेला आहे. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे आरोगय चांगले रहावे, यंत्रसामुग्री जवळ काम करताना सुरक्षितता लाभावी, कामगारांना कल्याणकारी सोयी उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्या कामाचे तास निश्चित असावेत, त्यांना मिळणाऱ्या रजा या प्रमुख उद्देशनुसार कारखांनासंबंधीचा कायदा १९४८ साली मंजूर करण्यात आला. कामगारांची कार्यक्षमता वाढविणे आणि त्यांच कल्याण साधणे आणि कामगारांचा काम करण्याच्या परिस्थितीतवर नियंत्रण ठेवणे हे प्रस्तुत कायद्याचे प्रमुख हेतू आहेत. कारखाना कायद्याच्या कलम ११ ते २० अंतर्गत कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होउ नये आणि त्यांच्या आरोग्याचे रक्षण व्हावे म्हणून खालील तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

**१: स्वच्छता:**

कारखान्यातील गटारे, नाल्या किंवा इतर मार्गाने कारखान्यात घाण व आरोग्यास अपायकारक वातावरण निर्माण होउ नये म्हणून प्रत्येक कारखान्यातील कामाच्या खोलीतील फरशी आठवडयातून एकदा जंतूनाशक औषधाने धुवून घ्यावी, जिना, बाक, फरशीवरील केर कचरा आणि घाण दररोज साफ करून योग्य प्रकारे नष्ट केला पाहिजे. तसेच कारखान्यातील खोल्यांना पाच वर्षातून किमान एकदातरी जंतूनाशक औषधाने धुवून घ्यावे, जिना, बाक, फरशीवरील केर कचरा आणि घाण दररोज साफ करून योग्य प्रकारे नष्ट केला पाहिजे. तसेच कारखान्यातील खोल्यांना पाच वर्षातून किमान एकदातरी तेल रंग किंवा रंगीत चुन्याचा रंग लावला पाहिजे. या रंग दिल्याच्या दिनांकासह नोंदी रजिस्टरमध्ये ठेवल्या पाहिजे.

**२ केरकचरा नष्ट करण्याची व्यवस्था:—**

कारखाना अधिनियम १९४८ च्या कलम १२मध्ये उत्पादन प्रक्रियेत जे वाया जाणारे किंवा टाकाउ पदार्थ, घाण किंवा केरकचरा निर्माण होईल ते सर्व पदार्थ वाहून नेण्याची किंवा नष्ट करण्याची व्यवस्था प्रत्येक कारखान्यात असली पाहिजे सोय कशी असावी यासंबंधी राज्य सरकार नियम करतात.



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

**३खेळती हवा आणि तापमान :—**

कारखान्यातील प्रत्येक कामाच्या खोलीत शुध्द हवा खेळती सहील आणि प्रत्येक खोलीतील तापमान कामगारांना आरामदायक वाटेल आणि त्याच्या प्रकृतीला अपाय होणार नाही अशी व्यवस्था असली पाहिजे. कारखान्यात योग्य ठिकाणी तापमापक यंत्र लावण्यासंबंधी सरकार आदेश देउ शकेल. एखादया कारखान्यात रंग लावल्यामुळे किंवा छताची उंची वाढविल्यामुळे तापमान कमी करणे शक्य आहे. असे वाटल्यास शासन तशा प्रकारचा आदेश देउ शकते.

**४ धूळ आणि धूर**

कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेमुळे धूळ, धूर किंवा इतर अपायकारक वायू निर्माण होत असेल तर तो श्वासोच्छवासाद्वारे कामगारांच्या शरीरात जाणार नाही. अशी परिणामकारक व्यवस्था कारखान्यात असली पाहीजे. ही धूळ, धूर वायू ई. कामाच्या खोलीमध्ये साठणार नाही आणि तो बाहेर आकाशात किंवा इतर ठिकाणी निघून जाईल अशी परिणामकारक व्यवस्था कारखान्यात असली पाहीजे.

**५ अती गर्दी—**

कारखान्यात कोणत्याही कामाच्या खोलीत कामगारांच्या आरोग्याला उपायकारक होईल. अशी गर्दी होत कामा नये. कामाच्या खालीत किती कामगार जास्तीत जास्त काम करू शकतात. त्याची माहिती प्रत्येक खोली बाहेर लावणे आवश्यक आहे. नव्याने स्थापन होणाऱ्या कारखान्यात ५०० घनफूट जागा उपलब्ध असली पाहीजे.

**६ प्रकाशाची व्यवस्था—**

कामगारांच्या कामाच्या जागेत तसेच त्यांच्या जाण्या येण्याच्या मार्गात नैसर्गीक किंवा कृत्रिम प्रकाशाची योग्य व्यवस्था असली पाहिजे. दारे व खिडक्यांची काचेची तावदाने आणि प्रकाश येण्यासाठी छतास बसविलेल्या काचा आतून व बाहेरून स्वच्छ केल्या पाहीजेत, डोळयांना अपायकारक असा प्रकाश व अपघाताला कारणीभूत अशा सावल्या पाडणारा प्रकाश पडणार नाही अशी व्यवस्था संबंधीत कारखान्यात असावी पाहीजे. प्रकाशाच्या झगझगटाने डोळे दिपणार नाहीत याची काळजी घेतली पाहीजे.

**७ पिण्याचे पाणी:**

कारखान्यात सर्व कामगारांना सोईचे होईल अशा विविध ठिकाणी शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय असली पाहीजे. प्रत्येक ठिकाणी कामगारांना समजेल अशा भाषेत पिण्याचे पाणी अशा सूचनेचा फलक लावावा. शौचालय, मुत्रीघर, धुण्याची जागा यापासून वीस फुटाच्या आत पिण्याचे पाणी ठेवता येणार नाही. उष्ण हवामानाच्या दिवसात थंड पाण्याची व्यवस्था २५० पेक्षा जास्त कामगार कामावर असलेल्या ठिकाणी केली पाहिजे.

**८ शौचालये व मुत्रीघरे—**

कारखान्यातील कामगार कामावर असताना सोयीस्कर अशा ठिकाणी त्यांना मुत्रीघरे अशा प्रकारची ठराविक पध्दतीचे संडास आणि मुत्रीघर कारखान्यात असली पाहिजेत. पुरूष आणि स्त्री कामगारांसाठी स्वतंत्र व्यवस्था असली पाहिजे. संडास व मुत्रीघरात स्वच्छ हवा आणि प्रकाशाची व्यवस्था असली पाहिजे ती नेहमी स्वच्छ ठेवली पाहिजे. त्यासाठी कारखान्यात सफाई कामगारांची नेमणूक करावी.

- **९ थुंकी पात्र—**

कारखान्यात सोयीच्या जागी थुंकीपात्र असावीत. थुंकीपात्राशिवाय कामगारांना इतर कोठेही थुंकता येणार नाही अशा प्रकारच्या सूचना कारखान्यात प्रमुख जागी लावल्या पाहिजेत. इतरत्र थुंकल्यास संबंधीत व्यक्तीस दंड होउ शकेल. शुंकीपात्रे नेहमी स्वच्छ ठेवली पाहिजेत.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

**कामगारांच्या सुरक्षितते संबंधी नियम:**

कारखान्यात काम करीत असताना कामगारांना विविध प्रकारच्या धोक्यांना तोंड द्यावे लागते. त्यापासून कामगारांचे संरक्षण व्हावे म्हणून कारखाना कायद्यात खालीलप्रमाणे नियम करण्यात आले आहेत.

**१. यंत्राना कुंपण:**

कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना ज्या यंत्रापासून धोका होण्याचा संभाव असेल अशा प्रत्येक यंत्राला चारही बाजूंनी पक्के कुंपन घालणे आवश्यक आहे.

**२. चालू यंत्रावर व यंत्राजवळ काम.**

कोणत्याही कारखान्यात कोणत्याही यंत्राची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची ते यंत्राची चालू असताना तपासणी करण्याची किंवा तपासणीच्या अनुरोधाने पट्टा चढविणे, बदलणे किंवा यंत्राला तेल देणे किंवा इतर किया करण्याची असल्यास घट्ट कपडे घातलेल्या व प्रशिक्षीत व प्रोढ कामगारांनाच द्यावीत.

**३.धोकादायक यंत्रावर तरूण कामगारांची नेमणूक:**

ज्या यंत्रावर तरूण कामगारांची धोका होईल अशी सूचना सुरूवातीलाच दिली पाहिजे. धोका झाल्यास बचाव कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच यंत्रावर काम करण्याचे पुरेसे प्रशिक्षण द्यावे.

**४.शक्तीप्रवाह तोडणारी साधने:**

यंत्राचे पटटे गतिमान आणि कमी गतीमान चाकावर ठेवण्यासाठी किंवा तेथून काढण्यासाठी योग्य व कार्यक्षम यांत्रिक साधने प्रत्येक कारखान्यात असली पाहिजे.

**५.स्वयंचलित यंत्रे :**

एखादे चालू यंत्र आणि त्या खोलीतील भिंत वगैरेसारखा दुसरा स्थिर भाग यामधून जाणे येणे करावे लागत असेल तर यंत्र चालू असताना त्याचा पुढे मागे होणारा कोणत्याही भाग स्थिर असलेल्या दुसऱ्या भागापासून १८ इंच दूर राहील अशी व्यवस्था केली पाहिजे.

**६.नविन यंत्रसामग्री:**

कारखान्यात नविन यंत्रसामग्री बसविताना शक्तीवर चालणाऱ्या यंत्राचा प्रत्येक धोकादायक भाग आच्छादित असावा. संबंधीत यंत्राचा प्रत्येक स्क्रु, बोल्ट, किल्ली, फिरता भाग इ. धोका होणार नाही अशा रीतीने बसविण्यात यावा.

**७.कॉटन ओपनरजवळ स्त्री आणि बालकामगारांना काम देण्यावर बंदी:**

कापूस स्वच्छ करणाऱ्या कॉटन ओपनर नावाच्या यंत्राजवळ स्त्री व बाल कामगारांना काम देता येणार नाही.

**८.पायऱ्या जिने व जाण्या येण्याचे मार्ग:**

कारखान्यातील प्रत्येक कामाच्या खोलीतली फरशी, पायऱ्या, जिने आणि जाण्यायेण्याचे मार्ग मजबूत बांधणीचे असले पाहिजेत.

**९. खडडे,डबकी, टाकी इ. संबंधी नियम:**

कारखान्यातील जमिनीवर किंवा फरशीमध्ये खडडे भेगा, डबकी, टाकी इ. असल्यास आणि त्यापासून कामगारांना धोका होण्याची शक्यता असल्यास संबंधित खडडे डबके, टाकी इ. सुरक्षीत झाकली पाहिजे.

**१०. डोक्यांचे संरक्षण:—**

उत्पादन प्रक्रियेतून उडणाऱ्या कणापासून किंवा बारीक तुकडयापासून निर्माण होणाऱ्या प्रखर प्रकाशामुळे कामगारांच्या डोळयांना अपाय होण्याची शक्यता असल्यास डोळयांचे संरक्षण होईल असा पडदा किंवा चष्मा काम करणाऱ्या प्रत्येक कामगारास देण्यास यावा.



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

संदर्भ गृंथ सूची:—

१. नरेंद्र चपळगावकर व इतर:विकास:संकल्पना आणि मार्ग यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
२. धनश्री पाटील: मानवी हक्काचे प्रकार आणि कलम दि. ०४जुलै २०१८
३. डॉ.विनायक पेंढारकर: भारतीय व्यापारी व औद्योगिक कायदे पिंपळापुरे अॅन्ड के. पब्लिशर्स, नागपूर.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani